आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२६ जून २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून भारताने त्याविरुद्ध जोरदार लढा उभारल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- पॅक्स सिलिका समिट एआय तंत्रज्ञानाच्या करारावर भारतासह ३४ देशांच्या स्वाक्षऱ्या

- महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या मसुद्याला राज्य मत्रिमंडळाची मंजुरी/ चालू अधिवेशनात सरकार विधेयक मांडणार

- छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यास अपहार प्रकरणी ८ आरोपींना अटक

**<><><><><>**

अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून भारताने त्याविरुद्ध जोरदार लढा उभारल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत नार्को कोऑर्डिनेशन सेंटरच्या दहाव्या बैठकीला संबोधित करत होते. अंमली पदार्थांचा विळखा हा राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक स्थैर्य, आर्थिक हितसंबंध आणि तरुण पिढी तसंच देशाच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचंही शहा यांनी यावेळी नमूद केलं. अंमली पदार्थांच्या समस्येविरुद्ध एकत्रित लढा देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

- **- -होल्ड... बाईट - अमित शहा - -**

- **<><><><><>**

आसामच्या श्रीभूमी जिल्ह्यात दहा कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ पकडण्यात आले असून एकाला अटक झाली आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. या प्रकारात गुंतलेल्यांचं रॅकेट उघड करण्यासाठी पोलीस तपास करत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

झारखंडच्या रांची जिल्ह्यात पोलिसांनी ६० लाख रुपये किमतीची अफू जप्त केली असून दोन जणांना अटक केली आहे. त्यांच्याजवळून दोन मोबाईल फोन्स आणि एक वाहन जप्त केलं आहे.

<><><><>

वॉशिंग्टनमध्ये काल झालेल्या पॅक्स सिलिका समिटमध्ये एआय तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठीच्या अमेरिकेच्या नेतृत्वातील उपक्रमावर भारतासह ३४ देशांनी स्वाक्षऱ्या केल्या. अमेरिकेचे अर्थ राज्य मंत्री जेकब हेलबर्ग यांनी एआय क्षेत्रातल्या संधीवरच्या संयुक्त निवेदनाबाबत यावेळी माहिती दिली. या परिषदेत सहभागी देशांनी एआय युगासाठी विकास आणि नाविन्यतापूर्णतेला प्रोत्साहन देणाऱ्या दृष्टिकोनाचा स्वीकार केला. भारताबरोबर या क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवायला अमेरिकेला आनंद होत आहे, असं ते म्हणाले. या परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन आणि भारतीय उद्योगांच्या प्रतिनिधींनी केलं.

<><><><>

देशभरात आज मुहर्रम पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हौतात्म्याचं स्मरण करून देणारा हा दिवस आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मोहरम निमित्त दिलेल्या संदेशात म्हटलंय की, हजरत इमाम हुसेन यांचं कार्य सत्य आणि न्यायाप्रति वचनबद्ध राहण्याची प्रेरणा देत राहील. मोहरम निमित्ताने ठिकठिकाणी 'ताझिया' मिरवणुका काढल्या जाणार आहेत. त्या दृष्टीनं वाहतुकीचं नियमन आणि सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

मोहरम निमित्त मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजार आज बंद आहेत.

<><><><>

शेतकरी कल्याण योजनांचा लाभ जमीन कसणाऱ्या महिला शेतकऱ्यांनाही घेता यावा याकरता महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या मसुद्याला राज्य मत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. जमीन कोणाच्याही नावावर असली तरी ती कसणाऱ्या महिलांना शेतकऱ्यांसाठीच्या सरकारी योजना आणि अनुदानाचा लाभ घेता येईल. अशा महिलांना महिला शेतकरी प्रमाणपत्र जारी करण्याचा प्रस्ताव विधेयकात आहे. त्यात ग्रामसभा आणि नागरी स्वराज्य संस्थांचा सहभाग असेल.

हे विधेयक विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

नागपूर मेट्रोच्या कन्हान विस्तारित मार्गासाठी तसंच मुंबईत स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू वांद्रे किल्ल्याशी जोडण्याकरता अतिरिक्त जोडरस्ता बांधण्याच्या कामाला मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा उपसमितीने काल मान्यता दिली.

<><><><><>

छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक नेत्यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

प्रधानमंत्री म्हणाले, शाहू महाराज सामाजिक न्याय आणि समतेचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांचे महान कार्य आणि आदर्श राष्ट्राला प्रेरणा देत आणि मार्गदर्शन करत राहील, अशा शब्दांत त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये आदरांजली वाहिली.

अमित शहा म्हणाले की, एक सुसंवादी, समतावादी आणि न्यायपूर्ण भारत घडवण्याचा शाहू महाराजांचा आदर्श आजही तितकाच समर्पक आणि प्रेरणादायी आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, शाहू महाराजांचं सामाजिक सुधारणेतील योगदान अमूल्य आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही शाहू महाराजांनी अस्पृश्यता आणि सामाजिक भेदभावाविरुद्ध लढा देऊन समतावादी आणि सर्वसमावेशक समाजाचा भक्कम पाया घातल्याचे सांगत मजबूत समाज घडवण्यासाठी त्यांचे कार्य सतत प्रेरणा देत राहतील, असे सांगितले. शाहू महाराचांची दूरदृष्टी आणि लोककल्याणाचे कार्य सर्वांना नेहमीच प्रेरणा देत राहील, अशा शब्दांत केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनीही त्यांना आदरांजली वाहिली.

छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या सामाजिक न्याय दिनानिमित्त राज्यात समता दिंडीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

<><><><><>

अयोध्येच्या श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाला मिळालेल्या देणग्यांच्या अपहार प्रकरणी एफ आय आर दाखल झाल्यानंतर राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी आपापल्या पदांचा राजीनामा दिला आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या प्रसिद्धी विभाग संचालकांनी ही माहिती दिली.

दरम्यान, याप्रकरणी विशेष तपास पथकानं दाखल केलेल्या एफआयआरमधल्या आठ आरोपींना काल अटक केली.

एसआयटीने मंगळवारी आपला अहवाल सरकारला सादर केला होता. त्यानंतर काल एफआयआर दाखल करण्यात आला. ट्रस्टचे सदस्य कृष्णमोहन यांच्या लेखी तक्रारीवरून श्री राम जन्मभूमी पोलीस ठाण्यात अपहाराचा गुन्हा नोंदवला होता.

<><><><><>

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज पुद्दुचेरीतल्या पूर्णनकुप्पम इथल्या ४०० वर्षांहून अधिक जुन्या आणि जीर्णोद्धार केलेल्या 'मुझियान कुलम' या ऐतिहासिक तलावाचे उद्घाटन केले. थवलकुप्पमजवळ असलेला हा दोन एकरचा तलाव पल्लव काळातील असल्याचे मानलं जातं. हा तलाव गावासाठी पिण्याचे पाणी आणि सिंचनाचा स्रोत म्हणून वापरला जात असे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये तलावाच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू झालं होतं.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडर पुरवठ्यावर लागू केलेले सर्व निर्बंध केंद्र सरकारने पूर्णपणे हटवले आहेत. यामुळे औद्योगिक, व्यावसायिक आणि सेवा क्षेत्रातल्या ग्राहकांना एलपीजीचा पुरवठा पूर्वीप्रमाणे सुरळीतपणे उपलब्ध होणार आहे. तसंच, संकटकाळात बंद करण्यात आलेल्या घाऊक एलपीजी पुरवठ्याच्या नियमांमध्येही शिथिलता देण्यात आली आहे.

<><><><><>

महिला या केवळ विकासाच्या लाभार्थी नसून विकसित भारत २०४७च्या उद्दिष्टाला गती देणाऱ्या सर्वात प्रभावी घटक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी केलं. त्या आज किर्गिस्तानमध्ये बिश्केक इथे आयोजित शांघाय सहकार्य संघटना महिला मंच २०२६ला दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होत्या. सुमारे १० कोटी महिला ९० लाखांहून अधिक स्वयंसहाय्यता गटांमध्ये संघटित झाल्या असून त्यापैकी ३ कोटींपेक्षा जास्त लखपती दीदी बनल्या आहेत, असं त्या यावेळी म्हणाल्या. मिशन शक्ती' आणि 'मिशन पोषण २.०' सारख्या योजनांमुळे महिलांची सुरक्षा, त्यांची काळजी आणि आर्थिक क्षेत्रातील सहभाग या गोष्टींना चालना मिळत असून भारताने महिलांच्या

नेतृत्वाखालील विकासाप्रति आपली वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केल्याचंही त्या म्हणाल्या.

<><><><><>

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत ड गटात तुर्कियेने अमेरिकेचा ३-२ असा पराभव केला आहे. तर ड गटाच्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पॅराग्वेशी झालेला सामना बरोबरीत सोडवला. या देशांबरोबरच जपान, स्वीडन, इक्वेडोर, जर्मनी या देशांनीही राऊंड ऑफ ३२मध्ये प्रवेश केला आहे. ही फेरी नॉकआऊट पद्धतीची असेल. या फेरीत ब्राझील आणि जपान यांच्यात येत्या २९ तारखेला सामना होणार आहे. तर मोरोक्कोशी लढत नेदरलँडबरोबर होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना रात्री साडेदहा वाजता पाहता येईल.

<><><><><>

महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'अ' गटाच्या सामन्यात भारताने बांगलादेशचा पाच खेळाडू राखून पराभव केला.  मँचेस्टर इथे  काल रात्री झालेल्या या सामन्यात बांग्लादेश संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला; आणि निर्धारित २० षटकांत १३६ धावा केल्या. भारताने ५ खेळाडू गमावत, हे लक्ष्य सतराव्या षटकातच पूर्ण केलं. शेफाली वर्माने ३४ चेंडूंत ५३ धावा केल्या. ती  'सामनावीर' ठरली.

<><><><><>

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, आज बेलफास्ट इथे भारत आणि यजमान आयर्लंड संघा दरम्यान पहिला टी २० सामना होत आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ६ वाजता सामना सुरू होईल. भारत आणि आयर्लंड यांच्यात दुसरा आणि अंतिम टी-20 आंतरराष्ट्रीय सामना येत्या रविवारी होणार आहे.

//<><><><><>//